दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १६ वे • अंक ३५६ • MAHMAR/2006/17212 • रायगड • बुधवार दि.२३ मार्च २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## उद्धव ठाकरे ॲक्शन मोडमध्ये

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे मेहुणे बिझनेसमन श्रीधर पाटणकर यांच्यावर सक्तवसुली संचलनालय अर्थात ईडीने मोठी कारवाई केली आहे. पाटणकर यांचे जवळपास साडे सहा कोटींचे ११ फ्लॅट्स ईडीने जप्त केले आहेत. आतापर्यंतची राष्ट्रवादीच्या मंत्र्यांच्या पाठीमागे ईडी लागली होती. पण आता ईडीचं टार्गेट ठाकरे आणि त्यांचे निकटवर्तीय आहेत. याच पार्श्वभूमीवर दिवसेंदिवस महाराष्ट्रातला ईडीचा ॲक्टिव्हनेस पाहता मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंनी उद्या सकाळी ११ वाजता कॅबिनेट बैठक बोलावली आहे.

ठाकरे सरकारमधील माजी गृहमंत्री अनिल देशमुख तसंच सध्या बिनखात्याचे मंत्री असलेले नवाब मलिक यांच्यावर ईडीने कारवाई केली होती. तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बहिणींच्या घरावर आयकर विभागाने छापे मारले होते. एकंदरित दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या केंद्रीय यंत्रणांच्या कारवायांबाबत उद्या आयोजित केलेल्या कॅबीनेट बैठकीत चर्चेची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रयत संस्थेसाठी आदर्श वास्तू ठरणार : डॉ. अनिल पाटील

## लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयात पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे पुर्णाकृती शिल्प

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**गुणात्मक शिक्षण हे रयत शिक्षण संस्थेचे मुख्य उद्दिष्ट आहे, त्या अनुषंगाने कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय व कनिष्ठ महाविदयालय रयत संस्थेसाठी आदर्श वस्तू ठरणार आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी आज (दि. २२) कामोठे येथे केले. रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कुल आणि ज्युनिअर कॉलेज येथे पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे पुर्णाकृती शिल्प उभारण्यात आले आहे. त्याचे उदघाटन डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते व संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. त्यावेळी ते बोलत होते.**




या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष भगिरथ शिंदे, स्थानिक स्कुल कमिटीचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे उपाध्यक्ष पी. जे. पाटील, मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य आर. डी. गायकवाड, मीनाताई जगधने, राजेंद्र उर्फ तात्या फाळके, आबासाहेब देशमुख, सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर, माजी सचिव प्रा. गणेश ठाकूर, पश्चिम विभाग विभागीय चेअरमन राम कांडगे, मध्य विभाग चेअरमन संजीव पाटील, सहसचिव संजय नागपुरे, ऑडिटर डॉ. मेनकुदळे, ओएसडी शहाजी डोंगरे, जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, जनरल बॉडी सदस्य प्रशांत पाटील, विनायक पाटील, दशरथ भगत, सुधीर घरत, विभागीय अधिकारी आर. पी. ठाकूर, यांच्यासह भाजपचे कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, जिल्हा उपाध्यक्ष के. के. म्हात्रे, ॲड. आशा भगत, 'क' प्रभाग समिती सभापती अरुणा भगत, नगरसेवक विकास घरत, विजय चिपळेकर, नगरसेविका कुसुम म्हात्रे, हेमलता गोवारी, संतोषी तुपे, युवा नेते राजेश गायकर, रवींद्र गोवारी, कामगारनेते सुरेश पाटील यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

भाषणाच्या सुरुवातीला बोलताना, कर्मवीर अण्णांची समाधी आणि पुतळे आहे, मात्र शिल्प नव्हते, ७५० शाखांमध्ये नाही ते कामोठे या शाखेत उभे केले आहे, त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे खास आभार मानत असल्याचे डॉ. अनिल पाटील यांनी सांगितले. एक इंच जागा आणि एकही वीट जवळ नसताना कर्मवीर अण्णांनी संस्था स्थापन करण्याचे स्वप्न बघितले आणि ते प्रत्यक्षात आणले. गुणवत्तेकडे आयुष्यभर अण्णांनी लक्ष केंद्रित केले आणि आशिया खंडातील सर्वात मोठी संस्था म्हणून उदयास आली. ९५ सालानंतर रयत शिक्षण संस्थेने विविध उपक्रम राबविले आणि त्या अनुषंगाने दर्जेदार शिक्षण देण्याचे काम करत शिक्षण क्षेत्रातील विविध यश प्राप्त केले. आमच्याकडे पाच महत्वाचे घटक आहेत, त्यामध्ये कर्मवीर अण्णा, रयत प्लांट, शरद पवार साहेब, रामशेठ ठाकूर साहेब, आणि १६ हजार रयतसेवक आहेत, त्यामुळे संस्था अधिक जोमाने काम करीत आहे. रामशेठ ठाकूर यांनी दर्जाच्या बाबतीत कधीही तडजोड केलेली नाही म्हणूनच कामोठे विद्यालयाची हि इमारत रामशेठ ठाकूर यांच्यामुळेच डौलाने उभी राहिली आहे. आधुनिक सुविधा देण्याचा प्रयत्न देण्याबरोबरच काळाप्रमाणे चालले पाहिजे. त्यामुळे जगाची भाषा असलेल्या इंग्रजीला डावलून चालणार नाही तो उद्देश भावी पिढीच्या हितासाठी असून उद्योग, व्यवसाय, नोकरी, उन्नतीसाठी महत्वाचा आहे. जागतिक दर्जाचे शिक्षण देणे हे रयत शिक्षण संस्थेचे मानस असून ते या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयातून सुरु होत आहे, असेही डॉ. अनिल पाटील यांनी आवर्जून नमूद केले. तसेच कर्मवीर अण्णांच्या पूर्णाकृती शिल्पबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे त्यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, आजचा दिवस माझ्या दृष्टिकोनातून महत्वाचा असल्याचे सांगितले. कर्मवीर अण्णांचा पुर्णाकृती शिल्प पाहून मन भरून आला आहे. असा पुतळा व्हावा अशी मनापासून इच्छा होती. ती शिल्पकृतीतून पूर्ण झाली आणि त्याचे आज अनावरण झाले. रयतेचे वातावरण माझ्या मनात भिनले आहे. रयत माझ्या जीवनातील अविभाज्य घटक आहे. अण्णांची समाधी आणि पुतळा पाहिल्यावर धन्य वाटते, त्याप्रमाणे येथील हे शिल्प प्रतिकृती आपल्याला प्रेरणा देत राहणार आहे. या विद्यालयाच्या उभारणीत कामोठे व परिसरातील ग्रामस्थांनी कष्ट घेतले आहे. स्वर्गीय एन. डी. पाटील यांच्या हस्ते या विद्यालयाच्या कामाचे भूमिपूजन झाले होते. सुरुवातीला १२ वर्गखोल्या होत्या, संस्थेने मला हि शाळा दत्तक घ्यायला सांगितली. आता हे विद्यालय पाच मजली झाले आहे. रयत शिक्षण संस्थेचे पनवेलवर प्रेम आहे, त्यामुळे पनवेल उरणमध्ये शाखांचा विस्तार झाला असून हे विद्यालय रायगड विभागाच्या दृष्टिकोनातून महत्वाचे आहे. स्टेट बोर्ड आणि आणि सीबीएसई बोर्डचे हे विद्यालय सर्व सुविधायुक्त झाले आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रजी शिक्षण वाघिणीचे दूध आहे असे सांगत त्याचे महत्व पटवून दिले आहे आणि ती गरज ओळखून दर्जेदार शिक्षण देण्याचे काम केले जात आहे. सर्व समाजासाठी शिक्षण देण्याचे काम कर्मवीर अण्णांनी केले आहे. त्यामुळे अण्णांचे ऋण फेडण्याचे काम करीत राहू, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी अधोरेखित केले.

## आदिवासी कातकरी समाजाच्या उत्थानाची जबाबदारी सर्वांची : विलास पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

समाजातील सर्वच वंचितांसाठी नियोजनबद्ध व कालबद्ध उत्थान कार्यक्रमाची गरज आहे, आदिवासी कातकरी बांधवांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन कोकण विभागीय आयुक्त श्री.विलास पाटील यांनी आज पनवेल येथे केले.




पनवेल मधील क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे जिल्हाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग यांच्या विद्यमाने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव निमित्ताने जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतील कातकरी उत्थान अभियानांतर्गत सप्तसूत्री कार्यक्रमाद्वारे विविध योजनांचा लाभ वाटप कार्यक्रम संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोकण विभागीय आयुक्त श्री.विलास पाटील हे होते तर जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे आणि पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते हे लाभ वाटप करण्यात आले. यावेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेणच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव, पनवेल उपविभागीय अधिकारी राहुल मुंडके, कर्जत उपविभागीय अधिकारी अजित नैराळे, श्रीवर्धन उपविभागीय अधिकारी अमित शेडगे, पनवेल तहसिलदार विजय तळेकर, कर्जत तहसिलदार विक्रम देशमुख, खालापूर तहसिलदार आयुब तांबोळी, उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, गटविकास अधिकारी संजय भोये, तालुका कृषी अधिकारी श्री.चौधरी, जिल्हा परिविक्षा अधिकारी अशोक पाटील, बाल संरक्षण अधिकारी चेतन गायकवाड, तहसील कार्यालयाचे विनोद लचके व इतर अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

विभागीय आयुक्त विलास पाटील पुढे म्हणाले की, कातकरी बांधवांमधील युवक-युवतींना स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन महत्त्वाचे आहे. माणूस शिक्षणाने नक्कीच मोठा होतो. आपण जन्माने जरी सामान्य परिस्थितीत जन्मलो असलो तरी शिक्षण घेऊन, मेहनत करून आपण आपली सामान्य परिस्थिती बदलू शकतो. जीवनात निरोगी आरोग्याचेही अनन्यसाधारण महत्त्व आहे. यासाठी आरोग्य तपासणी नियमित होणे गरजेचे आहे. आदिवासी बांधवांमधील स्थलांतरण थांबायला हवे आणि यासाठी या आदिवासी,कातकरी बांधवांना शाश्वत रोजगार मिळवून देण्यासाठी,उपजीविकेचे साधन उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन बांधील आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने .../२

## मासेमारी जेट्टीच्या प्रश्नाबाबत तातडीने बैठक लावून काम मार्गी लावणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यातील मौजे साखरीआगर येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत उभारण्यात येणाऱ्या मासेमारी जेट्टीचे काम पूर्ण होण्यासाठी तातडीने बैठक बोलावण्यात येईल, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

साखरीआगर येथे राष्ट्रीय कृषी विकास योजनेतंर्गत अद्याप जेट्टीचे काम सुरू झाले नाही याबद्दल विधानसभा सदस्य भास्कर जाधव यांनी लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित केली. लक्षवेधीच्या चर्चेत विधानसभा सदस्य ड. आशिष शेलार, मनीषा चौधरी यांनी भाग घेतला.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, मच्छीमारांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासन प्रयत्नशील असून या कामाच्या अंदाजपत्रकात सध्या वाढ झालेली आहे हे लक्षात घेता संबधित जिल्ह्याचे पालकमंत्री, मस्त्यव्यवसाय विकास मंत्री आणि विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून या कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करून देणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली.

लक्षवेधीला उत्तर देताना मत्स्यव्यवसायमंत्री अस्लम शेख म्हणाले की, राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत १५ डिसेंबर २०११ रोजी या जेट्टीसाठी रु.२.९६ कोटी रकमेची मान्यता देण्यात आली होती. ऑक्टोबर २०१२ रोजी मच्छीमारांनी काम सुरु करण्यास विरोध केल्यामुळे मंजुर जागेपासून ८० मीटर पश्चिमेची जागा निवडण्यात आली. मे २०१६ मध्ये सागरी नियमन क्षेत्र प्राधिकरण (CRZ) व पर्यावरण विभागाची परवानगी नसल्यामुळे कामास स्थगिती देण्यात आली. २८ डिसेंबर २०२० रोजी या जेट्टीस पर्यावरण विभागाची परवानगी प्राप्त झाली.

सुधारित राज्य दरसुचीनुसार नव्याने तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार या जेट्टीची प्रकल्प किंमत रु.८.४३ कोटी इतकी झाली आहे, असेही मंत्री श्री. शेख यांनी सांगितले.

## शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीत सध्या ३५ कोटींची तरतूद : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीत सध्या ३५ कोटी रुपये राष्ट्रीयकृत बँकेत मुदतठेव स्वरूपात गुंतवण्यात आले असून त्यावरील मिळणाऱ्या व्याजामधून राज्यातील पत्रकारांना दुर्धर आजार, अपघात झाल्यास किंवा त्यांच्या मृत्यूपश्चात वारसांना मदत करण्यात येत आहे असे माहिती व जनसंपर्क विभागाच्या राज्यमंत्री कुमारी अदिती तटकरे यांनी सांगितले.



याविषयी विधानसभेचे सदस्य रोहित पवार यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्याला उत्तर देताना कुमारी तटकरे बोलत होत्या. या योजनेंतर्गत अधिस्विकृतीधारक पत्रकार व त्याची पत्नी/पती तसेच त्यांच्यावर अवलंबून असलेली मुले यांना वैद्यकीय उपचारार्थ आर्थिक मदत देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत आजवर २५८ पत्रकार व त्यांचे कुटुंबिय यांना एकूण रु.१ कोटी ५८ लाख ५२ हजार ७११ एवढी रक्कम वैद्यकिय कारणास्तव आर्थिक मदत करण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले.

पत्रकारांना सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये मोफत आरोग्याची सुविधा देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये केशरी व पिवळे शिधापत्रिकाधारक किंवा तहसीलदाराचा उत्पन्नाचा दाखला असलेल्या पत्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेमुळे राज्यातील पत्रकार व त्यांच्या कुटूंबियांना याचा फायदा झाला आहे. याच दृष्टीकोनातून महात्मा फुले जन आरोग्य योजनेमध्ये पत्रकारांचा समावेश करण्यात आलेला आहे.

शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीत पूर्वी १० कोटी रुपयांची तरतूद होती. गेल्या दोन वर्षात त्यामध्ये आणखी २५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, अशी माहितीही कुमारी तटकरे यांनी दिली. महाराष्ट्र राज्यातील प्रसारमाध्यमातील व्यक्ती आपली कर्तव्ये .../२

### न्हावा ग्रामस्थांना १५ दिवसात फक्त अर्धा तासच पाणी

## संतप्त ग्रामस्थांची सिडको भवनावरच धडक ; अधिकाऱ्यांना घेराव

**दै.रायगड नगरी । उरण**

दररोज पाच तास पाणी पुरवठा करण्याचे सिडकोने दिलेले आश्वासन फोल ठरल्याने आणि १५ दिवसात फक्त अर्धा तासच पाणी मिळत असल्याच्या निषेधार्थ सर्वपक्षीय सुमारे २५० न्हावा ग्रामस्थांनी सिडकोच्या कार्यालयावर सोमवारी मोर्चा काढून अधिकाऱ्यांना घेराव घातला. न्हावा ग्रामपंचायतींची न्हावा-खाडी आणि तीन पाडे मिळून जवळपास साडेचार हजार लोकसंख्या आहे.



लोकसंख्येच्या मानाने दररोज नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायतीची दररोज दिड लाख लिटर पाण्याची मागणी आहे. मात्र मागील काही महिन्यांपासून मागणीच्या निम्म्याहूनही कमी पाणी पुरवठा होत आहे. अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे मात्र नोव्हेंबर महिन्यापासूनच पाणी टंचाईचा सामना करण्याची वेळ ग्रामपंचायतीवर येऊन ठेपली आहे. पाणी टंचाईमुळे नागरिकांवर तलाव, विहीर आणि उपलब्ध होणाऱ्या इतर स्त्रोतचा आधार घ्यावा लागत आहे. त्यानंतरही पुरेश्या प्रमाणात नागरिकांना पाणी मिळत नाही.पाणी टंचाईचे संकट दूर करण्यासाठी मंत्रालयात खासदार सुनील तटकरे, कॉँग्रेस कमिटीचे .../२

मा.राव साहेब

प्रो.जमा रु.५०/-

अर्जदारतर्फे वकील : ॲड.श्री.मनोज म्हात्रे
ॲड.ज्योती सरोदे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साहेब, वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३८३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०५/२०२२

१) श्रीमती.गीता इंदर पांडे
वय : ५८ वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार १ ते ३ रा.फ्लॅट नं.सी २/३२,
ज्ञानेश्वर नगर, को.ऑप.हौसिंग सोसायटी, किडवाई रोड,
शिवडी-वडाळा, मुंबई, महाराष्ट्र-४०००३१ अर्जदार

तमाम जनतेस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे पती कै.इंदर ध्वज धर्मानंद पांडे यांचा मृत्यू १४/०७/२०२१ रोजी एमपीसीटी हॉस्पिटल, सेक्टर नं.४, सानपाडा, नवीमुंबई येथे झालेला असून कै.इंदर ध्वज धर्मानंद पांडे हे हयात असताना त्यांनी झेरोधा ब्रोकींग लिमिटेड या आर्थिक गुंतवणूक करणाऱ्या संस्थेमार्फत खालील नमूद विविध कंपनीच्या भाग-भांडवलात (Share's) मध्ये आर्थिक गुंतवणूक त्या आर्थिक गुंतवणुकीचा इंग्रजीत सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**विविध कंपनीच्या भाग-भांडवल (Share's) चे इंग्रजी सविस्तर वर्णन**

Account Status : Active
Statement as on : 28 Jan 2022
Total Portfolio Value=5490500.28* (as per closing rate of 28 jan 2022)

| Sr. No. | ISIN | ISIN NAME | ISIN Listing | Paid Up Value | Balance | Last Closing Price | Value |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | INE208A 01029 | ASHOK LEYLAND LIMITED EQUITY SHARES OF RS 1/- EACH AFTER SUB DIVISION | Listed | 1 | 909 | 130.95 | 119033.6 |
| 2 | INE905P 01028 | B.C.POWER CONTROLS LIMITED#NEW EQUITY SHARES FACE VALUE RS.2/- AFTER SUB DIVISION | Listed | 2 | 2300 | 6.84 | 15732 |
| 3 | INE119A 01028 | BALRAMPUR CHINI MILLS LTD-NEW RE 1-AFTER SPLIT | Listed | 1 | 731 | 421.85 | 308372.4 |
| 4 | INE263A 01024 | BHARAT ELECTRONICS LIMITED#EQ SH WITH FACE VALUE RE.1/- AFTER SUB DIVISION | Listed | 1 | 70 | 207.05 | 14493.5 |
| 5 | INE257A 01026 | BHARAT HEAVY ELECTRICALS LIMITED- NEW EQUITY SHARES OF RS.2/- AFTER SUB-DIVISION | Listed | 2 | 2330 | 57.8 | 134674 |
| 6 | INE029A 01011 | BHARAT PETROLEUM CORPORATION LTD EQUITY SHARES | Listed | 10 | 438 | 382.95 | 167732.1 |
| 7 | INE727S0 1012 | BHARAT ROAD NETWORK LIMITED#EQUITY SHARES | Listed | 10 | 281 | 36.8 | 10340.8 |
| 8 | INE376G 01013 | BIOCON LIMITED-EQUITY SHARES | Listed | 5 | 332 | 363.6 | 120715.2 |
| 9 | INE416D 01022 | BLISS GVS PHARMA LIMITED-EQUITY SHARES OF RE.1/- AFTER SPLIT | Listed | 1 | 243 | 97.25 | 23631.75 |
| 10 | INE010B 01027 | CADILA HEALTHCARE LIMITED#NEW EQ SH WITH FV RE.1/- AFTER SUB DIVISION | Listed | 1 | 671 | 396.1 | 265783.1 |
| 11 | INE172A 01027 | CASTROL INDIA LIMITED# NEW EQ SHARES OF RS.5/- AFTER CAPITAL REDUCTION AS PER SCHEME OF RRANGEMENT | Listed | 5 | 606 | 125.55 | 76083.3 |
| 12 | INE486A 01021 | CESC LIMITED#NEW EQUITY SHARES WITH FACE VALUE RE.1/- AFTER SUB DIVISION | Listed | 1 | 530 | 84.6 | 44838 |
| 13 | INE178A 01016 | CHENNAI PETROLEUM CORPORATION LIMITED- EQ SHARES (FORMERLY- MADRAS REFINERIES LIMITED) | Listed | 10 | 350 | 108.55 | 37992.5 |
| 14 | INE522F0 1014 | COAL INIDA LIMITED- EQUITY SHARES | Listed | 10 | 1094 | 161.6 | 176790.4 |
| 15 | INE230A 01023 | EIH LIMITED-NEW EQUITY SHARES OF RE.2/- AFTER SPLIT | Listed | 2 | 167 | 136.15 | 22737.05 |
| 16 | INE220J0 1025 | FUTURE CONSUMER LIMITED# NEW EQUITY SHARES OF RS.6/- AFTER CAPITAL REDUCTION | Listed | 6 | 2808 | 7.37 | 20694.96 |
| 17 | INE752P 01024 | FUTURE RETAIL LIMITED# NEW EQ SH WITH FV RS.2/- AFTER CAPITAL REDUCTION | Listed | 2 | 149 | 48.75 | 7263.75 |
| 18 | INE129A 01019 | GAIL (INDIA) LTD [FORMERLY GAS AUTHORITY OF INDIA LTD) | Listed | 10 | 3085 | 141.85 | 437607.3 |
| 19 | INE776C 01039 | GMR INFRASTRUCTURE LIMITED- NEW EQUITY SHARES OF RE.1/- AFTER SPLIT | Listed | 1 | 946 | 40.5 | 38313 |
| 20 | INE101D 01020 | GRANULES INDIA LIMITED #NEW EQUITY SHARE WITH FACE VALUE RS.1/- AFTER SUB DIVISION | Listed | 1 | 42 | 300.5 | 12621 |
| 21 | INE038A 01020 | HINDALCO INDUSTRIES LIMITED-EQUITY SHARES OF RE.1/- AFTER SPLIT | Listed | 1 | 610 | 490.4 | 299144 |
| 22 | INE531E0 1026 | HINDUSTAN COPPER LIMITED EQUITY SHARES OF RS.5/- AFTER CAPITAL REDUCTION | Listed | 5 | 666 | 123.8 | 82450.8 |
| 23 | INE267A 01025 | HINDUSTAN ZINC LIMITED- NEW EQUITY SHARES OF RS.2/- AFTER SUB-DIVISION | Listed | 2 | 388 | 315.25 | 122317 |
| 24 | INF109K C1NT3 | ICICI PRUD ASSET MGMT CO LTD# ICICI PRU MF-ICICI PRUENTIAL GOLD EXCHANGE TRADED FUND | Listed | 1 | 87 | 42.47 | 3694.89 |
| 25 | INF109K0 12R6 | ICICI PRUDENTIAl AMC LTD# ICICI PRUDENTIAL MF-ICICI PRUDENTIAL NIFTY EXCHANGE TRADEO FUND | Listed | 10 | 46 | 184.1 | 8468.6 |
| 26 | INE043D 01016 | IDFC LIMITED # EQUITY SHARES | Listed | 10 | 500 | 63.85 | 31925 |
| 27 | INE148I0 1020 | INDIABULLS HOUSING FINANCE LIMITED# NEW EQ SH OF RS.2/- SUB DIVISION AS PER THE SCHEME OF AMALGAMATION | Listed | 2 | 488 | 211.15 | 103041.2 |
| 28 | INE562A 01011 | INDIAN BANK-EQUITY SHARES | Listed | 10 | 208 | 150.15 | 31231.2 |
| 29 | INE242A 01010 | INDIAN OIL CORPORATION LIMITED EQUITY SHARES | Listed | 10 | 2617 | 124.1 | 324769.7 |
| 30 | INE154A 01025 | ITC LIMITED-EQUITY SHARES OF RE.1/- AFTER SPLIT | Listed | 1 | 666 | 217.55 | 144888.3 |
| 31 | INE351F0 1018 | JAIPRAKASH POWER VENTURES LIMITED-EQUITY SHARES | Listed | 10 | 5291 | 9.11 | 48201.01 |
| 32 | INE970X 01018 | LEMON TREE HOTELS LIMITED # EQUITY SHARES | Listed | 10 | 333 | 48.35 | 16100.55 |
| 33 | INE103A 01014 | MANGLORE REFINERY & PETROCHEMICALS LTD- EQUITY SHARES | Listed | 10 | 3703 | 46.5 | 172189.5 |
| 34 | INE196A 01026 | MARICO LIMITED-NEW EQUITY SHARES OF RE.1/- AFTER SPLIT | Listed | 1 | 50 | 471 | 23550 |
| 35 | INF247L0 1023 | MOTILAL OSWAL AMC LTD# MOTILAL OSWAL MF-MOTILAL OSWAL MIDCAP 100 EXCHANGE TRADEO FUND | Listed | 10 | 312 | 31.33 | 9774.96 |
| 36 | INE139A 01034 | NATIONAL ALUMINIUM COMPANY LIMITED- NEW EQUITY SHARES OF RS-5/- AFTER SUB-DIVISION | Listed | 5 | 1172 | 108.8 | 127513.6 |
| 37 | INE848E0 1016 | NHPC LIMITED-EQUITY SHARES | Listed | 10 | 476 | 29.75 | 14161 |
| 38 | INF204K B17I5 | NIPPON LIFE INDIA AM LTD# NIPPON INDIA MF-NIPPON INDIA ETF GOLD BEES | Listed | 1 | 633 | 41.43 | 26225.19 |
| 39 | INF204K C1089 | NIPPON LIFE INDIA AM LTD# NIPPON INDIA MF-NIPPON INDIA NIFTY PHARMA ETF | Listed | 10 | 2904 | 13.06 | 37926.24 |
| 40 | INE213A 01029 | OIL & NATURAL GAS CORPORATION LIMITED NEW EQUITY SHARES OF RS-5/- AFTER SUB-DIVISION | Listed | 5 | 2187 | 168.95 | 369493.7 |
| 41 | INE785M 01013 | PC JEWELLER LIMITED- EQUITY SHARES | Listed | 10 | 746 | 25.7 | 19172.2 |
| 42 | INE752E0 1010 | POWER GRID CORPORATION OF INDIA LIMITED-EQUITY SHARES | Listed | 10 | 124 | 210.15 | 26058.6 |
| 43 | INE190H 01024 | SAKUMA EXPORTS LIMITED# NEW EQUITY SHARES FACE VALUE RE.1/- AFTER SUB DIVISION | Listed | 1 | 10076 | 13.26 | 133607.8 |
| 44 | INE062A 01020 | STATE BANK OF INDIA# NEW EQUITY SHARES OF FV RE.1/- AFTER SUBDIVISION | Listed | 1 | 326 | 523.35 | 170612.1 |
| 45 | INE114A 01011 | STEEL AUTHORITY OF INDIA LIMITED EQUITY SHARES | Listed | 10 | 1111 | 97.4 | 108211.4 |
| 46 | INE939A 01011 | STRIDES PHARMA SCIENCE LIMITED # EQUITY SHARES | Listed | 10 | 46 | 392.25 | 18043.5 |
| 47 | INE323C 01030 | THE INDIAN HUME PIPE COMPANY LTD- NEW EQUITY SHARES OF RS.2/- AFTER SUB-DIVISION | Listed | 2 | 71 | 215 | 15265 |
| 48 | INE470Y0 1017 | THE NEW INDIA ASSURANCE COMPANY LIMITED#EQUITY SHARES | Listed | 5 | 592 | 138.55 | 82021.6 |
| 49 | INE961D 01019 | UNITED DRILLING TOOLS LIMITED-EQUITY SHARES | Listed | 10 | 71 | 549.05 | 38982.55 |
| 50 | INE972X 01014 | VAISHALI PHARMA LIMITED # EQUITY SHARES | Listed | 10 | 434 | 37.2 | 16144.8 |
| 51 | INE665L0 1035 | VARROC ENGINEERING LIMITED # NEW EQUITY SHARES FV.Re.1/- AFTER SUB DIVISION | Listed | 1 | 147 | 402.25 | 59130.75 |
| 52 | INE205A 01025 | VEDANTA LIMITED # EQUITY SHARES OF RE 1/- AFTER SPLIT | Listed | 1 | 1000 | 327.7 | 327700 |
| 53 | INE669E0 1016 | VODAFONE IDEA LTD# EQUITY SHARES | Listed | 10 | 20489 | 10.8 | 221281.2 |
| 54 | INE528G 01035 | YES BANK LIMITED#NEW EQUITY SHARES OF FV RS.2/- | Listed | 2 | 4367 | 13.37 | 58386.79 |
| 55 | INE256A 04022 | ZEE ENTERAINMENT ENTER LTD# 6% UNSEC CUM RED NPART NCONV PREF SH AFTER CONSOLIDATION-RD DT. 05-03-22 | Listed | 2 | 4666 | 2.08 | 9705.28 |
| 56 | INE256A 01028 | ZEE ENTERTAINMENT ENTERPRISES LIMITED | Listed | 1 | 468 | 285.6 | 133660.8 |

कै.इंदर ध्वज धर्मानंद पांडे हे हयात असताना त्यांनी वरील मुद्दा क्र.२ नमूद झेरोधा ब्रोकींग लिमिटेड या आर्थिक गुंतवणूक करणाऱ्या संस्थेमार्फत विविध कंपनीचे भाग-भांडवलात (Share's) मध्ये आर्थिक गुंतवणूक करण्याकरिता उघडण्यात आलेल्या दि.२३ जून २०१६ रोजीच्या खात्यातील DP ID No.12081600 आणि Client ID No.00555948 यामध्ये वारसदार म्हणून अर्जदार यांच्या नावाची नोंद केलेली आहे. सबब अर्जदार या कै.इंदर ध्वज धर्मानंद पांडे यांच्या नॉमिनेटेट कायदेशीर वारस असल्याने अर्जदार यांना मे.कोर्टाने वारस जाहीर करून अर्जदार यांना सक्सेशन दाखला देणे कायद्याचे दृष्टीने योग्य व बरोबर आहे.

वरील मुद्दा क्र.२ नमूद झेरोधा ब्रोकींग लिमिटेड या आर्थिक गुंतवणूक करणाऱ्या संस्थेमार्फत विविध कंपनीचे भाग भांडवलात (Share's) मध्ये आर्थिक गुंतवणूक केलेली रक्कम व्याजासहीत जी काही एकूण होत असेल ती जमा असलेल्या संपूर्ण रक्कमेचे विविध कंपनीचे भाग-भांडवलात (Share's) कै.इंदर ध्वज धर्मानंद पांडे यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार यांचे लाभांत हस्तातरीत करण्यासाठी अर्जदार यांनी अर्जदार यांनी झेरोधा ब्रोकींग लिमिटेड या आर्थिक गुंतवणूक करणाऱ्या संस्थेच्या कार्यालयात चौकशी केली असता अर्जदार यांस सक्सेशनचा दाखला आणणेस बाबत सांगितले म्हणून अर्जदार सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल करीत आहेत.

वरील निवासी सदनिके संदर्भात अर्जदार यांस वारस दाखला मिळणेकरिता या मे.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांना वारस दाखला देण्याबाबत कुणाची कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास सदरची ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत न्यायालयात योग्य त्या कागदपत्रकासह सादर करावी. मुदतीत हरकत न आल्यास अर्जदारांकडून कायदेशीर साक्षी पुरावे नोंदवून अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यात येईल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

आज दि.२१/०३/२०२२ रोजी कोर्टाच्या सहीशिक्क्याने दिली.

| सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

# केएमसी महाविद्यालयात 'एनसीसी दिवस' समारोह साजरा

**दै.रायगड नगरी । खोपोली**

आपल्याला आयुष्यात आपले ध्येय गाठायचे असेल तर चालत रहा, आयुष्यात शिस्त खूप महत्वाची असते, त्यामुळे आयुष्यात शिस्त बाळगा, असे आवाहन खालापूर पोलीस स्टेशनचे पीएसआय बजरंग राजपूत यांनी एनसीसी कैडेट्स तरूणींना केले.




महाराष्ट्र ५ गर्ल्स बीएन एनसीसीच्या वतीने केएमसी महाविद्यालयात 'एनसीसी दिवस' आज दि. २२ मार्च मंगळवार रोजी साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर शितल गायकवाड(राष्ट्रीय स्पोर्ट प्रसन्न ),खालापूर नगर पंचायत मुख्याधिकारी रश्मी चव्हाण, खालापूर नगर पंचायत नूतन नगराध्यक्षा रश्मी मोंडवे, पीएसआय बजरंग राजपूत, खोपोली नगर परिषद उपायुक्त गौतम भगळे, माजी नगरसेविका जीनी सॅम्युअल, अर्चना पाटील, जेष्ठ पत्रकार पहिलवान हनुमंतराव ओव्हाळ, प्राचार्य कोकणे सर आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

सुरूवातीला शारदा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर कैडेट्स दिव्या नाईक हिने स्वागत गीत सादर केले. पाहुण्यांचा सत्कार तसेच राष्ट्रीय स्तरावर आपला ठसा उमटविलेल्या एनसीसी कैडेट्सचा विशेष सत्कार यावेळी महाविद्यालयाकडून करण्यात आला.

पीएसआय राजपूत पुढे म्हणाले की, आज सर्वच क्षेत्रात महिला नेतृत्व करीत आहेत. मात्र, पुरुष - महिला असा भेदभाव न करता ध्येय गाठण्यासाठी सतत चालत रहा. हातात मोबाईल असले तरी पुस्तके जास्तीत जास्त वाचत रहा, असे आवाहन करतानाच आई-वडीलांना योग्य तो सन्मान द्यायला हवा, तेच आपल्याला शिक्षीत व सुसंस्कृत करतात. मोबाईल हातात आहे, म्हणून आपल्याला सर्व ज्ञान मिळते असे नाही. मोबाईलचा अतिरेक न करता चारित्र्य जपा, असेही ते म्हणाले.

मुलींमध्ये मुलांपेक्षा शारीरिक क्षमता कमी असली तरी जिद्द असली तर तरूणी वरचढ ठरू शकतात. आजच्या काळात महिला सक्षमीकरणाची गरज आहे, असे प्रतिपादन खालापूर नगर पंचायत मुख्याधिकारी रश्मी चव्हाण यांनी केले. दरम्यान, यावेळी केएमसी महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी तथा नगरसेविका जीनी सॅम्युअल आदींनी प्रतिक्रिया व्यक्त केल्या. शेवटी विविध स्पर्धांमधील यशस्वी एनसीसी कैडेट्स बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी बेस्ट एनसीसी कैडेट्स रोहिणी घरत (२०११-१२), पूजा मोते (२०१२-१३), दिपाली सांळुखे (२०१३-१४), सुशीला केळकर (२०१४-१५), सरीता गुप्ता (२०१५-१६), कोमल मोरे (२०१६-१७), अनुजा पाटील (२०१७-१८), अंकिता चेऊलकर (२०१८-१९), पायल देशमुख (२०१९-२०) यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# तळा शिवसेना वतीने तिथीप्रमाणे शिवजयंती साजरी ; शिवमर्दानी व मल्लखांब प्रात्यक्षिकांनी तळेकरांचे लक्ष वेधले

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शिवसेनेच्या वतीने तिथी प्रमाणे फाल्गुन वद्य ३ तृतीया दि.२१ रोजी २२ शिवजयंती साजरी करण्यात आली.

यानिमित्ताने सकाळी १०वा. श्री सत्यनारायणाची महापूजा,सौ.वश्री नरेश सुर्वे सपत्नीक (नगरसेवक) यांच्या हस्ते करण्यात आले. सायंकाळी ६वा. शिवमर्दानी आखाडा,मल्लखांब साळाव रेवदंडा याची चित्त थरारक प्रात्यक्षिकांनी तळे वासीयांच्या डोळ्याचे पारणे फिटले हे शिवजयंती उत्सवाचे खास आकर्षण ठरले. तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ शहरप्रमुख राकेश वडके जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते वसंतशेठ लोखंडे नगरसेविका नेहा पांढरकामे शिवसैनिक डॉ.मनोज पाथरे, माजी उपनगराध्यक्षा सायली खातू, लिलाधर खातू, नमीत पांढरकामे माजी नगरसेवक विठोबा चांडीवकर, चंद्रकांत भोरावकर आदी मान्यवर उपस्थित होते.

मल्लखांब प्रात्यक्षिकाचे उद्घाटन तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ, शहर प्रमुख राकेश वडके, अँड चेतन चव्हाण, नरेश सुर्वे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले. साध्या पध्दतीने शिवजयंती साजरी करण्यासाठी सर्व शिवसैनिक, कार्यकर्ते, नगरसेवक, सेविका, शिवप्रेमी यांच्या सहकार्याने साजरी झाली. आखाड्यातील बाल कलाकरांनी आपली कला सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले.



# पैशांसह सापडलेले पाकीट केले परत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पैशांसह सापडलेले पाकीट शैलेंद्र सिंग यांना परत करण्यात आले आहे. त्यामुळे सिंग यांनी सुभाष रोडपालकर आणि मयुर तांबडे यांचे आभार मानले आहेत.

विजय सेल्स, पनवेल जवळ नेरेपाडा येथील रिक्षा चालक सुभाष रोडपालकर यांना पाकीट सापडले. यामध्ये सात ते आठ एटीएम कार्ड, शैलेंद्र सिंग यांचे जॉब कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स व इतर महत्त्वाचे कागदपत्र होती. यात पैसे देखील होते. याची माहिती त्यांनी मयूर तांबडे यांना दिली व ते पॉकेट मयूर तांबडे यांच्याकडे दिले. मयूर यांनी पॉकेट मधील कागदपत्र तपासली व त्या क्रमांकावर फोन करण्यास सुरुवात केली. मात्र समोरील व्यक्तीने शैलेंद्र सिंग यांना ओळखत नसल्याचे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मयूर तांबडे यांनी एटीएम द्वारे बँकेत जाऊन यांची माहिती घेण्याचे ठरवले. त्यानुसार नवीन पनवेल येथील क्सिस बँकेत ते गेले. त्या ठिकाणी चौकशी केल्यानंतर शैलेंद्र सिंग यांचा मोबाईल क्रमांक मिळाला. बँकेतील कर्मचाऱ्यांनी त्यांच्याशी संपर्क साधून मयूर तांबडे यांचा नंबर त्यांना दिला. बँकेतून मिळालेल्या मोबाईल क्रमांकद्वारे शैलेंद्र सिंग व मयूर तांबडे यांच्याशी बोलणे झाले. व शैलेंद्र सिंग हे मयूर तांबडे यांना खांदेश्वर पोलीस स्टेशन जवळ भेटायला आले. त्यानंतर त्यांना पैशांसह ते पॉकेट परत देण्यात आले. यावेळी त्यांनी सुभाष रोडपालकर आणि मयूर तांबडे याना धन्यवाद दिले.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## आदिवासी कातकरी समाजाच्या उत्थानाची जबाबदारी सर्वांची : विलास पाटील

उपस्थित कातकरी बांधवांना कोविड आपत्तीमध्ये दोन्ही पालक गमावलेल्या मुलांना संजय गांधी योजना शाखेमार्फत दरमहा अर्थसहाय्य रुपये १ हजार व अंत्योदय योजनेंतर्गत पिवळी शिधापत्रिका वितरण, राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेंतर्गत २० हजार रुपये रकमेचे धनादेश वितरण, संजय गांधी योजना शाखेमार्फत कातकरी विधवा महिला भगिनींसाठी व दिव्यांग लाभार्थ्यांसाठी दरमहा अर्थसहाय्य रुपये १ हजार चे लाभ वितरण, घेरावाडी माणिकगड येथील २४ कातकरी कुटुंबांना अंत्योदय शिधापत्रिका वाटप, कातकरी नवतरुणांना निवडणूक ओळखपत्रांचे वाटप, वनपट्टे वाटप या अंतर्गत सामुहिक तसेच वैयक्तिक ९०० दावे मंजूर केले असून प्रातिनिधीक स्वरुपात पाच लाभार्थ्यांना लाभ वाटप, जातीच्या दाखल्यांचे वाटप, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण यांच्यामार्फत आदिवासी ढाबा चालविण्यासाठी कातकरी गटांना अर्थसहाय्य वाटप, कातकरी बांधवांना वीटभट्टी योजनेंतर्गत अर्थसहाय्य वाटप, पंचायत समिती पनवेल तर्फे कातकरी बंधूंना घरकुल लाभ वाटप, पनवेल तालुका कृषी अधिकारी यांच्यामार्फत आदिम कातकरी बांधवांना ट्रॅक्टर/ पॉवर टिलर/ फळबाग वाटप, महिला व बालविकास कार्यालयामार्फत कोविडमुळे पालकत्व गमावलेल्या बालकांना पाच लाख रुपये अनुदान वाटप प्रमाणपत्र, अनाथ प्रमाणपत्र तसेच बालसंगोपन योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना लाभ, एकात्मिक बाल विकास सेवा योजना पनवेल कार्यालयामार्फत पोषण पोटली, माझी कन्या भाग्यश्री, पहिली मुलगी जन्माचे स्वागत, अनाथ प्रमाणपत्र, बालसंगोपन योजना व बेबी केअर किट लाभ वाटप, अन्नदा संस्थेमार्फत कुपोषित बालकांना पोषण पोटली आहाराचे वाटप, कर्जत उपविभागीय अधिकारी कार्यालयामार्फत शिलाई मशीनचे वाटप अशा विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. या देखण्या कार्यक्रमाचे सुंदरसे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध निवेदिका स्मिता गवाणकर यांनी केले तर तहसिलदार विजय तळेकर यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे,आदिवासी कातकरी बांधवांचे, अधिकारी कर्मचाऱ्यांचे आणि प्रसारमाध्यम प्रतिनिधींचे आभार मानले.

## शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीत सध्या ३५ कोटींची तरतूद : ना.आदिती तटकरे

पार पाडत असताना त्यांच्यावर होणाऱ्या हिंसक कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि प्रसारमाध्यमातील व्यक्ती किंवा प्रसारमाध्यम संस्था यांच्या मालमत्तेचे नुकसान किंवा हानी होण्यास प्रतिबंध करण्यासाठी तसेच अनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता त्याअंतर्गत आजवर २९ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यावरही निर्णय घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## संतप्त ग्रामस्थांची सिडको भवनावरच धडक ; अधिकाऱ्यांना घेराव

जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली मंत्रालयात संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन चर्चा करण्यात आली होती.त्यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी न्हावा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील नागरिकांना दररोज पाच तास पाणी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते.

त्यानंतरही पाणी पुरवठ्याची समस्या कायमच राहिल्याने आमदारांच्या नेतृत्वाखाली सिडको भवनातही पाणी प्रश्नावर बैठक घेण्यात आली होती. याबैठकीनंतर गव्हाण-शिवाजीनगर येथील जलवाहिनीमधून ८ इंच व्यासाची नवीन जोडणी टाकण्यात आली आहे.मात्र त्यानंतरही पाण्याची समस्या सुटलेली नाही. न्हावागाव उंचावर असल्यामुळे पाणी पंपाने साठवणूक टाकीत सोडावे लागते. त्यानंतरच नागरिकांना पाणी वितरण केले जाते.मात्र मुळातच पाणीच मिळत नसल्याने पाणी साठवून टाकीत सोडणार कुठून आणि नागरिकांना पाणी पुरवठा करणार असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सिडकोकडून पाणी पुरवठाच सुरळीत होत नसल्याने मात्र नागरिकांना १५ दिवसात फक्त अर्धा तासच पाणी पुरवठा होत असल्याची माहिती सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे यांनी दिलीआहे.

पाणी टंचाईचे संकट दूर करण्याच्या मागणीसाठी संतप्त झालेल्या न्हावा ग्रामस्थांनी काल सिडको भवनावरच धडक दिली.इतक्यावरच न थांबता महिलांसह संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना घेराव घालून पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.यावेळीही अधिकाऱ्यांनी पुन्हा एकदा पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले आहे.या सर्व पक्षीय आंदोलनप्रसंगी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, उपसरपंच मंजुषा ठाकूर, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, माजी सरपंच जागृती ठाकूर ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष शैलेश पाटील, माजी उपसरपंच किसन पाटील, ग्रामसुधारणा मंडळाचे माजी अध्यक्ष चंद्रकांत भोईर, महिला मंडळ अध्यक्षा मिनाक्षी पाटील,शांता म्हात्रे आणि सुमारे २५० ग्रामस्थ उपस्थित होते.यामध्ये महिलांची संख्या मोठी होती.

# जुन्या बस स्थानक नाक्यावर सीसीटीव्हीची नजर

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पालीतील जुन्या बस स्थानक नाक्यावर सीसीटीव्ही लोकार्पण सोहळा नुकताच संपन्न झाला. पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या वाढदिवसा निमित्त स्वीकृत नगरसेवक सुधाकर मोरे यांच्या सौजन्याने हे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. पाली नगराध्यक्षा गीता पालरेचा, जिल्हा परिषद सदस्य सुरेश खैरे. उपनगराध्यक्ष आरिफ मनियार राष्ट्रवादी काँग्रेस पाली शहराध्यक्ष अभिजीत चांदोरकर यांच्या हस्ते या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरीक उपस्थित होते. या सीसीटीव्ही मुळे जुन्या बस स्थानक नाक्यावर तिन्ही बाजूंना करडी नजर राहणार आहे. यामुळे पोलिसांना देखील फायदा होणार आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# माथेरान मधील घाटरस्त्यात निसर्गाच्या रंगांची उधळण

**दै.रायगड नगरी । माथेरान**

निसर्गाची अदभूत लीलया ,वसंत ऋतू मधील नैसर्गिक रंगपंचमीच्या छटा एक विलोभनीय देखावा पाहण्यासाठी आणि खऱ्या खुऱ्या या दैवी शक्तीने प्रस्थापित केलेल्या वृक्षवल्ली वरील शिंपण केलेल्या आपल्या अविष्काराने वेगवेगळ्या रंगांची उधळण मुक्त हस्ते केलेली ही नयनरम्य दृश्ये पाहण्यासाठी आवर्जून माथेरानला भेट दिल्याशिवाय ही साक्षात प्रचिती प्राप्त होऊ शकत नाही. तसे पाहिल्यास माथेरान मध्ये सर्व ऋतूत नयनरम्य देखावे न्याहाळता येतात. पावसाळ्यात तर संपूर्ण डोंगर वर्षाऋतु मध्ये न्हाऊन निघाल्यावर उंचीवरून फेसाळत वाहणारे जलप्रपात, शुभ्र पाण्याचे निर्झर, हिरव–ागार शालू परिधान केलेला काळाकभिन्न डोंगर ही सारी दृष्ये डोळ्यांची पारणे फेडणारी असतात त्याचप्रमाणे वसंत पंचमी पासून वसंतऋतुला सुरुवात होते. रंगपंचमी आलेली असताना निसर्ग मुक्तहस्ताने रंगांची उधळण करत असताना इथे दिसतो. पळस फुलतो, काटेसावर बहरतो, मोगऱ्याची फुले निसर्गाच्या शृंगारात भर टाकतात आणि सुरु होतो निसर्गाचा रंगोत्सव ! माथेरानच्या सरस्वती विद्यामंदिर एक अभ्यासु शिक्षक संघपाल वाठोरे हे माथेरान येथील स्वतः उत्तम लेखक असून मराठी भाषेचे अध्यापक आहेत.

निसर्गाच्या सानिध्यात नेहमीच वावरणारे असे निसर्गप्रेमी व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख आहे. माथेरानच्या घाटरस्त्यातुन येताना त्यांनी आपल्या कॅमेऱ्यात ही रंगीबेरंगी रंगांची उधळण झालेली वृक्षवल्ली बंदिस्त केली



आहे. रायगड जिल्ह्यातील जगप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण असणाऱ्या माथेरानच्या डोंगर शिवारामध्ये काटेसावर, पळस रानमोगरा आदी पुष्पवैभव दिमाखात नजरेस पडते, तर त्याच बरोबर अनेक वृक्ष ही आपल्या पूर्ण–फुलांनी आपला अवतार बदलू पाहतात. निसर्गात अनेक ठिकाणी आपण फुलांच्या वेगवेगळ्या रंगछटा, त्याचे वैभव पाहत असतो. परंतु माथेरान आणि त्याच्या अवतीभवती वृक्षांनी आपलं रूपडं पालटून घेतलेले दिसते. हिरव्या गच्च असणाऱ्या झाडांमधून कोवळी पालवी धारण करून रंगीबिरंगी छटा दिवसागणिक नजरेस पडतात. आज पानझड, उद्या गुलाबी कोवळी पाने, परवा गडद लाल पाने तर पुढे एकेक दिवस आणखी रंग बदलून पुन्हा हिरव्या रंगाकडे मार्गक्रमण करत पाने आपली पूर्वावस्था धारण करतात. हा प्रवास निसर्ग प्रेमींसाठी पर्वणी आणि नजरेस सुखावणारा आहे.

वसंतोत्सवातील प्रमुख सण म्हणजे रंगपंचमी. हा रंगांचा सण आनंद द्विगुणित करणारा आहे. वसंताच्या आगमनाबरोबर निसर्ग रंगपंचमी खेळायला सुरुवात करतो. वेगवेगळ्या रंगांची उधळण तो मुक्तहस्ते करत असतो. कधी वातावरणातील आणि मनातील मरगळ झटकून टाकणारा रंगांचा उत्सव सुरू असताना निसर्गातील रंगोत्सव डोळ्याचे पारणे फेडत असतो. आपल्याला रस्त्याच्या कडेला, बागेत पिवळ्या झुपक्याचा बहावा दिसतो, कुठे जांभळ्या रंगाच्या कागदी फुलांचा ताम्हण लक्ष वेधतो तर कुठे पांगारा, काटेसावर बोगनवेल अशी विविध प्रकारची फुलझाडे बहरतात, तेव्हा अवचित आपले लक्ष वेधून घेतात. पण माथेरानचा डोंगर कुशीत, त्यांच्या अंगाखांद्यावर फुलांच्या बरोबरच अनेक झाडांच्या पानांनी रंग भरलेला दिसून येतो.

माणसाच्या अंगी असणाऱ्या दुर्गुणांचा होळीत नाश करायचा आणि सद्गुणांचा अंगीकार करायचा, म्हणजे हा होळीचा सण कदाचित आपण निसर्गाकडून शिकलो असणार. जीर्ण झालेल्या पानांना कुठलीही इजा न होता हळ–ुवारपणे आपल्यातून निरोप द्यायचा आणि आणि नव्याचे स्वागत करायचे तेही अगदी गळणाऱ्या पानाला दुःख न होता. काय किमया हे निसर्गाची नाही? दुर्गुणांची होळी करून सद्गुण अंगीकारणे, याप्रमाणे वृक्ष आपली पानगळ करून नवा बहर स्वीकारतात. माणसाचेही कदाचित असेच आहे. निसर्गाकडून आपण बऱ्याच गोष्टी शिकतो. अनादि अनंत काळापासून निसर्गाचा रंगोत्सवाचे सोहळे या सृष्टीत सुरू असावेत आणि ते राहतीलही कदाचित. आपल्याला याचमुळे प्रेरणा मिळाली आणि त्यातूनच निसर्गाचा आणि आपल्या भारतीय सणांचा ताळमेळ घातला गेला.

या आठ–पंधरा दिवसाच्या कालावधीत माथेरानच्या डोंगर आणि त्याच्या अवतीभवतीच्या अनेक वृक्षांनी आलटून–पालटून आपले रुपडे बदललेले दिसते. सुरुवातीला पानगळ झाली आणि निसर्गात अगदी नैराश्य निर्माण झाले आणि थोड्याच दिवसात पुन्हा त्या झाडाला नवी पालवी निर्माण झाली, पुन्हा नवचैतन्य निसर्गामध्ये निर्माण झालं. अशा ह्या रंगोत्सवात रंग खेळणारा निसर्ग आज माथेरानच्या अवतीभोवती दिसतोय.मन अगदी प्रसन्न होते. कदाचित तो आपल्याला सांगत असावा की चला तुम्ही सुद्धा तुमच्याकडची मरगळ झटकून टाका आणि पुन्हा नव्याने, नव्या उमेदीने प्रसन्नतेने नवी झालर पांघरून, नव्या आशा उराशी बाळगून कामाला लागा.. रंगोत्सवाच्या शुभेच्छा !

# पोलादपूरच्या ग्रामदैवतांच्या ग्रामप्रदक्षिणेनंतर शिमगोत्सवाची सांगता



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर नगरीचे ग्रामदैवत श्रीकाळभैरवनाथ जोगेश्वरी देवस्थानच्या शिमगोत्सवाची सांगता दरवर्षीप्रमाणे यंदा ग्रामदैवतांची ग्रामप्रदक्षिणा होऊन झाली. यावर्षी पालखी प्रदक्षिणेसोबतच रंगपंचमी सणाची रंगत वाढली. गेल्या दोन वर्षे कोविड–१९ च्या लॉकडाऊनमुळे खंडित झालेला जत्रौत्सव यंदा १३ एप्रिलरोजी होणार असल्याने सर्व भाविकांना जत्रौत्सवाचे वेध लागले आहेत.

सोमवारी पोलादपूर शहरातील भैरवनाथनगर सहाणेवर गोंधळानंतर श्रीकाळभैरवनाथ आणि समशेर सोनाराच्या चेड्यास पशूनैवेद्य झाला. यावेळी ग्रामस्थांच्या बैठकीमध्ये यंदा प्रथमच सह्याद्रीनगरामध्ये पालखी थांबविण्याचा निर्णय सरपंच बाबूराव महाडीक यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. महाप्रसादानंतर पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास ग्रामदैवतांची पालखी प्रदक्षिणेसाठी शहरातील विविध भागांमध्ये रवाना झाली. प्रत्येक वाडीवस्तीवर ग्रामदैवतांचे उत्साहाने स्वागत करण्यात आले. तरूणांमध्ये यंदा ग्रामदैवताच्या पालखी प्रदक्षिणेवेळी रंगांची उधळण करण्याचाही उत्साह जल्लोष दिसून आला. सावंतकोंड, पार्टेकोंडच्या प्रदक्षिणेनंतर पोलादपूर शहराच्या वेशीमध्ये आलेल्या पालखीचे स्वागत ठिकठिकाणी उत्साहामध्ये करण्यात आले. प्रत्येक वाडीवस्तीतील मानकरी व सेवेकरी तसेच भाविक यांनी ग्रामदैवतांच्या आगमनाचा आनंद द्विगुणित केला. शिस्तबध्द व कोणत्याही प्रकारचा विलंब न करता यंदाच्या पालखी प्रदक्षिणेला वेळेवर श्रीकाळभैरवनाथ मंदिरामध्ये रवाना करण्याचे देवस्थान विश्वस्तांचे प्रयत्न दिसून येत होते.

पोलादपूर शहरातील ग्रामदैवतांच्या शिमगोत्सवानंतर येण–ारा जत्रौत्सव देखील तब्बल दोन वर्षांनंतर बुधवार, दि. १३ एप्रिल २०२२ रोजी होणार असल्याने देवस्थान कमिटीसह भाविक आणि मानकरी सेवेकरी पुन्हा नियोजनासाठी प्रयत्नशील असून परिसरातील ग्रामदैवतांच्या सासनकाठी व पालख्यांच्या निमंत्रणासाठी तयारी सुरू होणार आहे.

# सकाळ पासुन मळभ दाटतय हलकी सर ठिबकली, पावसाळी वातावरण

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

वातावरण बिघडले वादळाची शक्यता वर्तविल्याने लोकांमध्ये साशंकता पण मंगळवार २२ मार्च दुपारपर्यंत तरी अस काही घडलच नाही. दिवसभर उन सावलीचा खेळ, गेले दोन तीन दिवस आकाशात मळभ दाटलयं, आज रंगपंचमीला सकाळ पासुनच पाऊस पडेल असे वातावरण होते. सकाळी नऊ साडेनऊच्या दरम्यान एक हलकीशी सर ठिबकली, पुन्हा तोच खेळ. एकंदरीत लहरी वातावरण दिसुन येत आहे.

याचा लोकांचे आरोग्यावर तसेच आंबा पिकावर, शेतीवर विपरित परिणाम होत असुन फळ गळती मोहर करपुन पिकाचे नुकसान होत आहे. आता अवकाळी पाऊस आणि वादळाची शक्यता कधी पण नाकारता येत नाही. हे चित्र जगाच्या पाठीवर सर्वत्र प्रत्यक्षात अनुभवायला मिळत असुन पाऊस वर्षभरात केंव्हाही आणि कुठेही पडतो. पावसाच्या या लहरीपणामुळे जनजीवन पुरते हवालदिल झाले आहे. ग्लोबल वॉर्मिंग धोक्याची घंटा पुन्हा पुन्हा चर्चेत येत आहे.




## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


मा.श्री.सोनावणे सो

**अर्जदाराचे वकील**
**दिपाली रामदास गावंड**
**वकील उच्च न्यायालय**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.२१८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०४/२०२२

१) श्रीमती.लिलाबाई आत्माराम पाटील
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.सुजित आत्माराम पाटील
वय : ४४ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्री.प्रितम आत्माराम पाटील
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.विशाल आत्माराम पाटील
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
रा.सर्व वलप, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

ज्याअर्थी कै.आत्माराम आंबो पाटील हे दि.१०/७/२०१५ रोजी मौजे : वलप, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

मौजे : एम.आय.डी.सी.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथील मे.हॉटेल विशाल या हॉटेलसाठीचा अनुज्ञप्ती परवाना क्र.पनवेल/घोट/१०७०/२००० मुदत दिनांक २२/११/२००० ते ३१/१२/२००१

कै.आत्माराम आंबो पाटील यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटी प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख २२/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

| सही/–<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/–<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

मे.सोनावणे साहेब यांचे कोर्टात

**अर्जदारातर्फे वकील ॲड.विक्रम पी. राठोड**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) यांचे कोर्टात, पनवेल
दि.चौ.अर्ज नं.३५४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०५/०५/२०२२

१) श्रीमती.पुनम प्रकाश तिवारी
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) कु.अथर्व प्रकाश तिवारी
वय : १६ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कु.वेदांत प्रकाश तिवारी
वय : ११ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
अर्जदार क्र.२ व ३ च्या वतीने
(श्रीमती.पुनम प्रकाश तिवारी)
४) प्रतिमा सत्यनारायण तिवारी
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
सर्व रा.रुम नं.०३, लक्ष्मी निवास, सर्वे नं.२४,
हिस्सा नं.२, भगतवाडी, सुकापूर, पालीदेवद,
नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, अर्जदार नं.१ यांचे पती व अर्जदार नं.२ व ३ ह्यांचे वडील व अर्जदार नं.४ यांचा मुलगा कै.प्रकाश सत्यनारायण तिवारी यांचा मृत्यू दि.२७/०६/२०१८ रोजी किंग ऍडवर्ड मेमोरिअल हॉस्पिटल अॅण्ड मेडीकल कॉलेज (के.ई.एम.) परेल, मुंबई येथे झालेला असून त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत. मयत कै.प्रकाश सत्यनारायण तिवारी ह्यांचे हयातील त्यांनी रा.रुम नं.०३, लक्ष्मी निवास, सर्वे नं.२४, हिस्सा नं.२, हाऊस नं.४१९ (जुना) १५८ (नवीन) भगतवाडी, सुकापूर, पालीदेवद, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ या इमारतीत दि.२९/१२/२०१२ रोजी मे.त्रंबक इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. तर्फे भागीदार श्री.मनिष श्यामकमल शुक्ला यांच्याकडून ॲग्रीमेंट फॉर सेल करून दुय्यम निबंधक कार्यालय पनवेल क्र.१ येथील नोंदणी कार्यालयात दस्त क्र.पवल १–१४४११/२०१२ नुसार खरेदी केलेली आहे. सदनिकेचे विस्तृत वर्णन येणेप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| अपार्टमेंट | प्लॉट नं. | रुम नं. | मजला | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| **रुम नं.०३, लक्ष्मी निवास, सर्वे नं.२४, हिस्सा नं.२, हाऊस नं.४१९ (जुना) १५८ (नवीन) भगतवाडी, सुकापूर, पाली देवद, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६** | **२४** | **०३** | **तळ मजला** | **४२५ चौ.फुट** |

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळणेकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्जदार हे कै.प्रकाश सत्यनारायण तिवारी यांचे कायदेशीर वारसदार आहेत याबाबत कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलामार्फत हजर होवून हरकती घ्याव्यात. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती न आल्यास सदर मे.कोर्ट उक्त अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीस पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत केल्यास त्यांना सदरहू मयताच्या मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ठिकाण पनवेल येथून दि.२२/०३/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

| सही/–<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/–<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

मुजावर सो.कोर्ट

**अर्जदाराचे वकील**
**ॲड.जान्हवी वाडकर–गोगटे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.३८४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२७/०४/२०२२

१) कृष्णा काना गायकवाड
वय : ७५ वर्षे, धंदा : काही नाही
रा.ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
२) तुळशीदास कान्हा गायकवाड
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
रा.८४ बी, विठ्ठल रखुमाई मंदिराजवळ,
ओवळे, ता.पनवेल, जि.रायगड
३) रुक्मिणी जीवन घरत
वय : ५५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.२५१, वरचे ओवळे, पो.पारगाव,
ता.पनवेल, जि.रायगड
४) भानुदास बाळाराम गायकवाड
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
रा.घर नं.४३३, ओवळे, पो.पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.यमुना काना उर्फ कान्हा गायकर उर्फ गायकवाड ही दि.१८/०७/२०१९ रोजी मयत झाल्याने अर्जदार यांनी कै.यमुना काना उर्फ कान्हा गायकर उर्फ गायकवाड हिचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पारगाव, ता.पनवेल, जि.रायगड**

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) |
|---|---|---|---|
| १६१ | ३६ | ५ | ०–२३–० |
| | ५३ | ८ | ०–०९–० |
| | ५७ | ९ | ०–०४–८ |
| | ५७ | ११ | ०–०५–६ |
| | ५८ | ७ | ०–०१–५ |
| | ६५ | १ | ०–०५–० |

अर्जदार हे कै.यमुना काना उर्फ कान्हा गायकर उर्फ गायकवाड हिचे कायदेशीर वारसदार आहेत. त्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.यमुना काना उर्फ कान्हा गायकर उर्फ गायकवाड हिच्या वारसपत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
दि.२२/०३/२०२२
पनवेल

| सही/–<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/–<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

मा.राव साहेब

**ॲड.शशिकांत काळू म्हात्रे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.४०३/२०२२
नि.नं.९/ड
ने.ता.२७/०४/२०२२

१) श्री.जयेश अंकुश म्हस्कर
वय : ३६ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.योगेश अंकुश म्हस्कर
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
१ ते २ रा.त्रिमुर्ती अपार्टमेंट, ए १/९,
रुम नं.ए ४, मानक हॉस्पिटल जवळ, सेक्टर ८,
नेरुळ, नवी मुंबई, नेरुळ, ठाणे
३) सौ.कामिनी विद्याधर पाटील
वय : ४४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.८१९, मराठी शाळेजवळ, सेक्टर ०१,
शिरवणे गाव, नेरुळ नोड, ठाणे
४) सौ.देवयानी प्रभाकर म्हात्रे
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.घर नं.४४९, नेरुळ गाव, बंचोली, मंदिर जवळ,
सेक्टर–२०, नेरुळ गाव, ठाणे
५) सौ.उज्वला योगेश भोईर
वय : ३८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.दापिवली, पो.रसायनी, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही ... सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ५ हे कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांचे वारस आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ५ यांचे वडील कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर हे दि.२६/०५/२०२१ रोजी मौजे : डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पिटल नेरुळ, नवी मुंबई येथे मयत झाले आहेत. तसेच कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांची आई कै.गुणाबाई रामचंद्र म्हस्कर ह्या दि.१७/०६/२०१० रोजी मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तसेच कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांची पत्नी कै.बेबीबाई अंकुश म्हस्कर या दि.२५/०४/२०२१ रोजी सिडको एक्सबिशन सेन्टर सी सी सी ॲण्ड डी सी एच सी वाशी, नवी मुंबई येथे मयत झाल्या आहेत. अर्जदार नं.१ ते ५ हेच कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांचे वारसदार आहेत तसेच अर्जदार नं.१ ते ५ यांच्याशिवाय कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांस आणखी कोणीही वारसदार नाहीत.

कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांचे नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व सामाईक मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन (अ)**
**मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| काळुंद्रे | १३७ (१६०) | १०४ | ४ | १–९–० |
| काळुंद्रे | १३७ (१६०)– (B) | १७ | ३ | १–७–० |

**मिळकतीचे वर्णन (ब)**
**मौजे : काळुंद्रे गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांचे स्वकष्टार्जित व मालकीची तसेच ताबेकब्जातील तसेच नावे असलेल्या मौजे : काळुंद्रे गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाच्या घर मिळकती आहेत.

| अ.क्र. | मौजे | घर क्र. | मजला | क्षेत्र चौ.फुट | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | काळुंद्रे गाव | ११५ | जी | २७५ | २६ |
| २ | काळुंद्रे गाव | १४३ | २ | ८५९ | ८० |

**मिळकतीचे वर्णन (क)**
**मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांचे स्वकष्टार्जित व मालकीची तसेच ताबेकब्जातील तसेच नावे असलेल्या मौजे : करंजाडे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाच्या सदनिका व वाणिज्य गाळे ही मिळकत आहे.

| अ.क्र. | मौजे | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | **करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड** | **सदनिका क्र.२०१, दुसरा मजला, रिव्हर व्यु, से.५ ए, प्लॉट नं.६२** | **कारपेट क्षेत्र २४.५७५ चौ.मी., सी.बी.क्षेत्र १.८०० चौ.मी. बाल्कनी क्षेत्र ४.९०० चौ.मी., टेरेस क्षेत्र ३.१६३ चौ.मी. आणि एफ.बी.क्षेत्र ४.१२५ चौ.मी.** |
| २ | **करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड** | **सदनिका क्र.२०२, दुसरा मजला, रिव्हर व्यु, से.५ ए, प्लॉट नं.६२** | **कारपेट क्षेत्र १८.५८८ चौ.मी., सी.बी.क्षेत्र १.८७५ चौ.मी., टेरेस क्षेत्र ३.२२० चौ.मी. आणि एफ.बी. क्षेत्र १.८०० चौ.मी.** |
| ३ | **करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड** | **सदनिका क्र.६०१, सहावा मजला, रिव्हर व्यु, से.५ ए, प्लॉट नं.६२** | **कारपेट क्षेत्र २४.५७५ चौ.मी., सी.बी.क्षेत्र १.८०० चौ.मी., बाल्कनी क्षेत्र ४.९०० चौ.मी., टेरेस क्षेत्र ३.१६३ चौ.मी. आणि एफ.बी. क्षेत्र ४.१२५ चौ.मी.** |
| ४ | **करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड** | **सदनिका क्र.६०२, सहावा मजला, रिव्हर व्यु, से.५ ए, प्लॉट नं.६२** | **कारपेट क्षेत्र १८.५८८ चौ.मी., सी.बी.क्षेत्र १.८७५ चौ.मी., टेरेस क्षेत्र ३.२२० चौ.मी. आणि एफ.बी.क्षेत्र १.८०० चौ.मी.** |
| ५ | **करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड** | **सदनिका क्र.६०३, सहावा मजला, रिव्हर व्यु, से.५ ए, प्लॉट नं.६२** | **कारपेट क्षेत्र १६.५९८ चौ.मी., सी.बी.क्षेत्र १.८७५ चौ.मी., बाल्कनी क्षेत्र २.२५२ चौ.मी., टेरेस क्षेत्र ३.२२० चौ.मी. आणि एफ.बी. क्षेत्र १.८०० चौ.मी.** |
| ६ | **करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड** | **सदनिका क्र.६०४, सहावा मजला, रिव्हर व्यु, से.५ ए, प्लॉट नं.६२** | **कारपेट क्षेत्र २४.२१९ चौ.मी., सी.बी.क्षेत्र १.८०० चौ.मी, बाल्कनी क्षेत्र ७.६६५ चौ.मी., टेरेस क्षेत्र ३.९८७ चौ.मी. आणि एफ.बी. क्षेत्र ४.१३६ चौ.मी.** |
| ७ | **करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड** | **शॉप क्र.३, तळमजला, रिव्हर व्यु, से.५ ए, प्लॉट नं.६२** | **कारपेट क्षेत्र ११.३४४चौ.मी. बाल्कनी क्षेत्र ३.४८० चौ.मी.** |

**मिळकतीचे वर्णन (ड)**
**मौजे : करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड**

कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांचे स्वकष्टार्जित व सामाईक मालकीच्या तसेच ताबेकब्जातील तसेच नावे असलेल्या मौजे : करंजाडे, तालुका : पनवे, जिल्हा : रायगड येथील खाालील वर्णनाच्या सदनिका मिळकत आहे.

| मौजे | मालमत्तेचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|
| **करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड** | **सदनिका क्र.७०३, सातवा मजला, रिव्हर व्यु, से.५ ए, प्लॉट नं.६२** | **कारपेट क्षेत्र १९.३८९ चौ.मी., सी.बी.क्षेत्र ३.२३१ चौ.मी. बाल्कनी क्षेत्र ११.४९८ चौ.मी., नॅचरल टेरेस १९.५०७ चौ.मी., टेरेस क्षेत्र ५.१२२ चौ.मी. आणि एफ.बी.क्षेत्र ३.७५० चौ.मी.** |

कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.अंकुश रामचंद्र म्हस्कर यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख २२/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

| सही/–<br>क.लिपीक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/–<br>सहा.अधिक्षक<br>दि.न्या.व.स्तर, पनवेल |
|---|---|---|

# पेणचे आंबा बागायतदार धोक्यात ; बदलत्या हवामानाचा फटका

**दै.रायगड नगरी । पेण**

मागील काही दिवसापासून हवामानात सारखा चढ उतार होत असून चार दिवस उष्णतेमध्ये भयंकर उन्हाचा पारा चढला होता. तर आता पुन्हा हवामानात बदल होऊन पावसाचे सावट पसरले असल्याने या बदलत्या हवामानामुळे पेणमधील आंबा बागायतदारांना मोठा फटका बसला आहे. यावर्षी आंब्याला चांगल्या प्रकारचा मोहर आल्याने येणाऱ्या काही दिवसात आंब्याचा पीक बहारदार येईल अशी आशा शेतकर्यांना वाटत होती मात्र या बदलत्या हवामानामुळे आंब्यावर भुरी, तुडतुडे तसेच मावा या रोगाची किड आंब्याला लागत असल्याने आंब्यावर आलेला मोहर खाली पडत आहे. त्यामुळे फळ बागायत शेतकरी मात्र चिंताग्रस्त झाला आहे.

पेण तालुक्यातील आंबा लागवडी खालील क्षेत्र ७९५ हेक्टरच्या वर आहे. त्यामुळे येथे चार पाच वर्षांपासून आंबा पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात केली



जात असली तरी मात्र या बदलत्या हवामानामुळे तसेच अवकाळी पावसामुळे सर्व प्रकारच्या आंब्यावर विपरीत परिणाम झाला आहे. मध्येच पडलेला अवकाळी पाऊस आणि आताचा ढगाळ वातावरण यामुळे नुकत्याच झाडाला उमललेल्या मोहराच्या अंकुरांना जोरदार फटका बसल्यामुळे आंब्याचे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांना वाटू लागली आहे. नोव्हेंबर-डिसेंबर महिन्याच्या कालावधीत आंब्याच्या झाडांना मोहोर फुलण्यास सुरुवात होते. या महिन्यात थंडीचा कडाका जास्त असतो परिणामी या महिन्यात आंबा चांगला होतो.

परंतु ऐनवेळी मोहोर फुलण्याच्या वेळेला हवामानातील बदलामुळे मोहा-राचे नुकसान झाल्याने आंबा उत्पादक संकटात सापडले आहेत. महाराष्ट्रात एकीकडे कोरोना, चक्री वादळ, भयानक पूरस्थिती आणि आता वारंवार होणारा हवामानात बदल यामुळे आंबा बागायदार मेटाकुटीला आले आहेत. चांगला आंबा येण्यासाठी बागायदारावर सर्व संकटांना माफ करून पिकांवर फवारणी, कीटकनाशक, बुरशीनाशक, खते वापरून आपले उत्पादन काढत असतो परंतु नैसर्गिक होणाऱ्या आपत्ती व्यवस्थापनाला कोण थांबवणार अशी आशा शेतकऱ्यांना वाटू लागली आहे.

अनेकदा झालेल्या नुकसानीची भरपाई राज्य शासनाकडून अजून पर्यंत मिळाली नाही त्यातच पीक विमा कंपनी सुध्दा बऱ्याच प्रमाणावर शेतकऱ्यांची फसवणूक करीत आहे.

## संक्षिप्त...

### मुरुड मध्ये रंगपंचमी साजरी

**दै.रायगड नगरी । मुरुड**


मुरुड मध्ये आज बाळगोपाळांनी रंगपंचमी मोठ्या उत्साहात साजरी केली. आज तसा शाळेचा दिवस पण रंगपंचमी साजरी करणार नाही असे कसे होणार. जशी शाळा सुटली तशी या मुलांनी आधीच आणुन ठेवलेले रंग बाहेर काढून एकमेकांना लावत मोठ्या आनंदाने रंगांची उधळण केली.



### ओमकार माळीने पटकाविले जलतरण स्पर्धेत गोल्डमेडल

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्याचे सुपुत्र, करंजा सुरकीचा पाडा येथील रहिवाशी कु. ओमकार सदानंद कोळी यांनी स्नेहानगर, स्विमिंग पूल धुळे येथे झालेल्या २ ऱ्या महाराष्ट्र राज्यस्तरीय जल-तरण स्पर्धेत उत्तम कामगिरी करत १०० मीटर,२०० मीटर,४०० मीटर फ्रीस्टाईल आणि २०० मीटर मिडले रिले,२०० मीटर फ्री स्टाईल रिले यामध्ये ५ गोल्ड मेडल पटकाविले आहे.या कामगिरीमुळे महाराष्ट्र मधून केरळ येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे. जल-तरण स्पर्धेत उत्तम कामगिरी करत गोल्ड मेडल पटकावून ओमकार कोळी यांनी उरणचे नाव सातासमुद्रा पलीकडे नेले आहे. गोल्ड मेडल मिळाल्याने ओमकार सदानंद कोळी यांच्यावर विविध स्तरातून, विविध क्षेत्रातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.मित्र परिवार, नातेवाईक, चाहत्यांनी त्याला प्रत्यक्ष भेटून तर अनेकांनी सोशल मीडिया द्वारे त्याला शुभेच्छा दिल्या आहेत.



## महसूल संघटनेची निदर्शने; ४ एप्रिल पासून बेमुदत संपावर जाणार

**दै.रायगड नगरी । तळा**

रायगड जिल्हा महसूल कर्मचारी संघटनेतर्फे विविध प्रलंबित मागण्यांसाठी घोषणा देऊन तळा येथे निदर्शने करण्यात आली दरम्यान शासन स्तरावर मागील दोन वर्ष पाठपुरावा करूनही न्याय मिळत नसल्याने महसूल संघटना बेमुदत संपावर जाणार आहे. राज्यातील महसूल विभाग (जिल्हाधिकारी कार्यालय उपविभागीय अधिकारी कार्यालय व तहसील कार्यालय) महसूल सहाय्यकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असून महसूल सहाय्यक भरतीसाठी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करून देखील भरती करण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. अव्वल कारकून मंडळ अधिकारी संवर्गातुन नायब तहसीलदार संवर्गात पदोन्नतीचे प्रस्ताव मंत्रालयात दीड ते दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे शासन निर्णय महसूल व वन विभाग दिनांक १० मे २०१९ अन्वये नायब तह-सीलदार संवर्ग म्हणून घोषित करण्यात आ-लेला आहे व त्यानुसार सर्व अव्वल कारकून व मंडळ अधिकारी यांच्या सेवा जेष्ठता याद्या राज्यस्तरावर एकत्रित करण्याबाबत शासनाने पत्र काढलेले आहे परंतु अव्वल कारकून व मंडळ अधिकारी हा जिल्हास्तरीय संवर्ग असल्यामुळे त्यांच्या याद्या जिल्हास्तरावर एकत्रच करण्याची प्रक्रिया ही अन्यायकारक असल्याने सदर पत्र तात्काळ रद्द करावे.



तसेच इतर मागण्यांबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही फक्त आश्वासन मिळत असून आश्वासनाची पूर्तता होत नसल्याने नाइलाजास्तव आंदोलन करावे लागत आहे. शासनास २१.२.२०२२ रोजी नोटीस देण्यात आली असून आश्वास-नाची पूर्तता न केल्यास आंदोलनाची दिशा खालीलप्रमाणे राहील १. दिनांक २१.३.२२ दुपारचे जेवण जेवणाच्या सुट्टीत कार्यालयाच्या द्वारावर निदर्शने करणे विभागीय आयुक्त जिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी तहसीलदार यांना निवेदन देणे हो या कार्यालयाच्या आवारात वस्तु-स्थिती नमूद करणारे फलक लावणे. २. दि.२३.३.२२ काळ्या फिती लावून काम करणे दुपारच्या जेवणाच्या सुट्टीत घंटानाद करून निदर्शन करणे ३.दि.२८.३.२२ एक दिवसाचा लाक्षणिक संप या दिवशी कर्मचारी शासनाचा निषेध म्हणून रक्तदान करतील ४. दि.४.४.२२ बेमुदत संप असे नमूद करण्यात आलेले आहे. या प्रसंगी रायगड जिल्हा महसूल कर्मचारी संघटना सरचिटणीस भूषण पाटील तळा तालुका अध्यक्ष सचिन महामुणकर, सेक्रेटरी सचिन चाळके, श्याम राठोड, संदीप आखाडे,संजय टेंबे,जयेश कदम श्रीपत शिर्के आदी उपस्थित होते.

## शिवरायांचे आचार विचार अंगिकारल्याने भविष्य उज्वल होईल

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

कपाळाला टिळा आणि गाडीला झेंडा लावून शिवभक्त होता येत नाही तर शिवरायांचे आचार विचार अंगिकारल्याने भविष्य उज्वल होईल अशाप्रकारचे मनोगत रायगड भूषण शिवभक्त सुखद राणे यांनी गड-किल्ले संवर्धन तथा शिवचरित्र व्याख्यान प्रसंगी व्यक्त केले.

रोहे तालुक्यातील श्री. क्षेत्र तळवली येथे जय हनुमान क्रीडा मंडळ व ग्रामस्थ यांच्या वतीने संपन्न झालेल्या छत्रपती शिवराय यांच्या जयंती सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यान प्रसंगी गड-किल्ले संवर्धन व संगोपन याबाबत मार्गदर्शन करताना ते बोलत होते.यावेळी माजी पोलिस पाटील खेळू मरवडे, सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ कोस्तेकर, रामचंद्र बामणे, ह.भ.प.मदन महाराज कोलाटकर, वसंत मरवडे, एकनाथ मरवडे, राम शेलार, सुभाष बामणे, भिमेश बामणे, अजित चितळकर, नरेंद्र मरवडे, अनंता मरवडे, सुरेश मरवडे, अशोक कोस्तेकर, नामदेव मरवडे, रवींद्र मरवडे, दयाराम मरवडे, नंदू मरवडे, मारुती बामणे, शंकर शेलार, किसन बामणे, रामकृष्ण नागावकर, अनिल कोलाटकर, हरिश्चंद्र मांगुळकर, अरविंद भिलारे, काशिराम गायकर, तानाजी मरवडे आदी मान्यवर व्यासपिठावर उपस्थित होते. या शिवजयंती उत्सव सोहळ्यानिमित्त छत्रपती शिवरायांची महा-पूजा, महाआरती, पालखी मिरवणूक, सांस्कृतिक कार्यक्रम, महाप्रसाद आदी कार्यक्रम संपन्न करण्यात आले.

यावेळी सुखद राणे यांनी गड-किल्ले संवर्धन व त्यांचा अभ्यास करणे याची आवश्यकता याबाबत महत्वपुर्ण मार्गदर्शन करून गड-किल्ले यांचा अभ्यास करा,इतिहासाचा अभ्यास करा.कारण इतिहासाची ओळख ठेवणारेच व शिवरायांचे आचार विचार यांचे अंगिकरण केल्याने आपले भविष्य घडवू शकतात असे शेवटी सांगितले.या उत्सव सोहळ्याचे यशस्वीतेसाठी मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी मोलाचे सहकार्य केले.

## पुस्तकांची शाळा रानवडी येथे ऐतिहासिक पुस्तकांचे प्रदर्शन

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील धैर्य सामाजिक संस्था संचलित पुस्तकांची शाळा रानवडी,पोलादपूर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त विद्या-र्थी आणि ग्रामस्थांसाठी ऐतिहासिक पुस्तकांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी स्वराज्य संकल्पक श्रीशहाजी राजे भोसले महाराजसाहेब ते पानिपत च्या युद्धापर्यंतचा मराठ्यांचा पराक्रम असा कालखंड म्हणजे स्वराज्याचे साम्राज्यात रूपांतर होऊन भारत देशात सर्वत्र मराठा साम्राज्याचा अंमल सुरू झाला. याच पराक्रमाची शौर्य गाथा सांगणाऱ्या कादंबरी, संदर्भ ग्रंथ, दुर्ग, व्यवस्थापन, युद्धतंत्र, शस्त्र अभ्यास ग्रंथ अशा विविध पुस्तकांचे प्रदर्शन भरवून वैचारिक शिवजयंती धैर्य सामाजिक संस्थेमार्फत साजरी करण्यात आली.



या उपक्रमासाठी धैर्य सामाजिक संस्थेचे अध्यक्ष ओंकार उतेकर, मदतनीस सुजल दळवी, रानवडी शाळेचे मुख्याध्यापक सोपान चांदे, शिक्षिका वंदना सकटे, अरुणा कराडे आणि विद्यार्थी उपस्थित होते. शिवजयंती दिनाचे औचित्य साधून सद्गुरु सेवा प्रतिष्ठान, पुणे या सामाजिक संस्थेने पुस्तकांच्या शाळेसाठी १०० पुस्तकांची भेट दिली. ऐतिहासिक, स्पर्धा परीक्षा पुस्तके, बालसाहित्य, कथा कादंबरी पुस्तके या पुस्तकांचा संस्थेने भेट दिलेल्या पुस्तकामध्ये समावेश होता.

## नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्परतेमुळे मोठी दुर्घटना टळली

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालीकेचे नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्परतेमुळे विद्युत वाहिनीमुळे होणारी मोठी दुर्घटना टळली आहे.



पनवेल शहरातील महाराष्ट्र बँकेजवळ अचानक पणे विद्युत वाहिनीच्या पोलवर सर्व्हिस केबल तुटून रस्त्यावर पडली होती. केबलमधून वीज प्रवाह सुरु असल्याने जीवित हानी होण्याची शक्यता होती. या घटनेची माहिती नगरसेवक राजू सोनी यांना मिळताच त्यांनी त्वरित महावितरणचे अधिकारी पांडुरंग बोके व किरण चौधरी यांना फोन करून तातडीने माणसे पाठवण्यास सांगितले. तसेच स्वतः उभे राहून त्यांनी हे काम तातडीने काम पूर्ण करून वीजपुरवठा सुरळीत केला. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी त्यांचे आभार मानले.

### जाहीर सूचना

आम्ही मे.सिमरन एन्टरप्राईजेस, सर्वसाधारण जनतेस कळवू इच्छितो की महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण विभागाने आमच्या सर्वे नं.७४३/२, ७४३/३अ, ७४३/४, ७४३/५, आणि ७४३/८ (प), गाव : पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे ''अपटाऊन ॲव्हेन्यू'' प्रकल्पाला दिनांक १३ मार्च २०२२, रोजी पत्र क्रमांक SIA/MH/MIS/230198/2021 अन्वये पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून मान्यता दिली आहे. सदर मान्यता पत्राची प्रत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या http://parivesh.nic.in/ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**मे.सिमरन एन्टरप्राईजेस**

### सुचना



कै.निळकंठ दत्तात्रय पराडकर, रा.कामोठे यांचा मृत्यू दि.२०/०१/२०२२ रोजी झाला. त्यांचे नावे असलेली मारुती सुझुकी अर्टीगा (MH-46-BK-1708) गाडी त्यांच्या पत्नी श्रीमती.निर्मला निळकंठ पराडकर यांच्या नावे करण्यात येत आहे. तरी कोणाचा आक्षेप असल्यास कळविण्यात यावे.

**सही/-**
**श्रीमती.निर्मला निळकंठ पराडकर**
**रुम नं.२०४, शिरवी हाईटस,**
**प्लॉट नं.३ डी + ३ ई, सेक्टर १७,**
**कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड**

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १) श्री.संजय हरिदास घरत, रा.जांभुळपाडा, पो.जासई, ता.उरण, जि.रायगड व २) श्री.रत्नदिप दिनेश म्हात्रे, रा.मु.११८ बी, वेताळ आळी, प्राथमिक शाळेमागे उलवा, ता.पनवेल, जि.रायगड खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिनीच्या मिळकती, कायम खरेदीखताने विकत घेणेसंबंधीचा व्यवहार श्री.सदांनद दुकल्या मढवी रा.गावठाण, हनुमान मंदिर जवळ, ता.उरण, जि.रायगड यांचेबरोबर केलेला आहे. व त्यांना बयाणाची रक्कमही दिलेली आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|
| जांभुळपाडा, ता.उरण, जि.रायगड | ३७ | १ | ०-०४-०० |

तरी सदरहू जमिनीवर कोणाचाही साठेकरार, खरेदीखत, मृत्यूपत्र, गहाण, दान, बक्षिस, कुळवहिवाट अगर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी तो प्रथमदर्शनी व कागदोपत्री पुराव्यासहीत आम्हाला खालील नमूद केलेल्या पत्यावर, नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसाच्या मुदतीत कळवावा. सबब, सदरहू, मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरहू मिळकतीचे, टायटल निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदरहू मिळकतीचे रजिस्टर खरेदी खताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणी हरकत उपस्थित केल्यास ती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, हे कळावे.

दि.२२/०३/२०२२

**सही/-**
**ॲड.नयना के. घरत**
**वकील उच्च न्यायालय**
MAH-5902/2009
**शॉप नं.०१, साई हृदवी अपार्टमेंट, सेक्टर ६, नेरुळ वेस्ट, नवी मुंबई-४००७०६**

**ॲड.प्रगती म्हात्रे**

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

क्रि.एम.ए.नं.३७/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.११/०४/२०२२

श्री.अजित अशोक म्हात्रे — अर्जदार

विरुद्ध

मा.ग्रामसेवक / निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी
ग्रामपंचायत जासई
ता.उरण, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचे वडील कै.सचिन अशोक म्हात्रे यांचा मृत्यू मौजे : मु.जासई, ता.उरण, जि.रायगड येथील राहत्या घरी दि.१२/०६/२००८ रोजी झालेला असून त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रामपंचायत जासई, पंचायत समिती उरण आणि तहसीलदार व इतर संबंधित यांच्या कार्यालयात करण्यात आलेली नाही. त्या कारणाने अर्जदार यांनी मे.न्यायालयात क्रिमिनल चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. तसेच कै.सचिन अशोक म्हात्रे यांच्या मृत्यूचा दाखला देण्याबाबत ज्या कुणाच्या हरकती असतील त्या हरकती सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत सदर न्यायालयात लेखी कळवाव्यात. तसे न केल्यास सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.०४/०३/२०२२ रोजी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, उरण** | (कोर्टाचा शिक्का) | **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, उरण**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जााहीर नोटीसीने कळविण्यात येते की, श्री.रुशील अनिरुद्ध बोबडे व इतर तिघे यांनी प्रोमोटर मे.सईबाबा बिल्डर्स एण्ड डेव्हलपर्स, यांचेकडून खरेदी घेतलेले मौजे : बाणेर येथील स.नं.२४०/२ व ३, या मिळकतीवरील साई हेरिटेज सोसायटीमधील तळमजल्यावरील दुकान क्र. डी १, चे संदर्भातील दि. २३/०३/२००१ रोजी मे. दुय्यम निबंधक, हवेली क्र. ४, पुणे येथे नोंदलेले मुळ आर्टिकल्स ऑफ अँग्रीमेंट दस्त क्र. ३२१३/२००१ वया दस्ताचे सुची २, हे गहाळ झाले आहेत. श्री. रुशील अनिरुद्ध बोबडे, रा - खारघर, नवी मुंबई, यांनी दि. ०९/०३/२०२२ रोजी खारघर पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे वर उल्लेख केलेले मुळ दस्तऐवज गहाळ झाल्याबद्दल रितसर प्रॉपर्टी मिसिंगची तक्रार रजिस्ट्रेशन क्र. ०५३१/२०२२ दाखल केली आहे. तरी वर उल्लेख केलेले मुळ दस्तऐवज ज्या कोणा व्यक्तीस सापडले असतील, त्यांनी ते मुळ दस्तऐवज सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांच्या आत, वरील मालकास अथवा खालील पत्त्यावर पोस्टाने अथवा प्रत्यक्ष हजर करावेत. सदर दस्तांचा गैरवापर झाल्यास तो वरील मालकांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

स्थळ : खारघर
दि.२२/०३/२०२२

**सही/-**
**ॲड. विशाल उमेश भंगाळे**
**श्रीविद्या, प्लॉट नं. ५८, लेन नं २,**
**गणंजय सोसायटी, युनिट क्र. ३,**
**कोथरुड, पुणे - ३८.**
**मो.नं. ९८५००५३४२७.**

**अर्जदारातर्फे वकील ॲड.अल्हाद पिंगळे**

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांच्या न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.४८/२०२०
नि.नं.१३/ड
ने.ता.२८/०४/२०२२

श्री.वासुदेव परशुराम पाटील वगैरे — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांच्या नयायालयात कै.भिमाबाई परशुराम पाटील यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. कै.भिमाबाई परशुराम पाटील हे दि.२४/०५/१९९७ रोजी मौजे : डोंगरी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.भिमाबाई परशुराम पाटील यांच्या मालकीच्या व ताबेकब्जा वहिवाटीच्या मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळती सिडकोने संपादीत केल्या आहेत.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : फुंडे, ता.उरण, जि.रायगड**

| गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं./हिस्सा नं. |
|---|---|---|
| फुंडे | ६९/७१ A | ४३/१३<br>४८/८<br>५५/११<br>५५/१२<br>६१/५<br>६१/६<br>६६/२<br>७२/१५ |
| फुंडे | ३८ | १०६/२५ |
| फुंडे | ६९/३८ | ७/४ B<br>१४/८<br>१४/१०<br>१०६/२६<br>११७/९<br>१२२/५<br>१३२/७<br>१३२/८<br>१३५/३<br>१३५/४<br>१५७/३ B<br>१५७/९ |

सदर मिळकतीच्या संपादनाच्या मोबदल्यात जेएनपीटी / सिडकोकडून १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर मिळणाऱ्या भूखंडामध्ये कै.भिमाबाई परशुराम पाटील यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नाव कमी करून सदर भूखंडावर त्याचे वारस अर्जदार १) श्री.वासुदेव परशुराम पाटील २) श्री.यशवंत परशुराम पाटील १ व २ रा.डोंगरी, ता.उरण, जि.रायगड ३) श्रीमती.द्वारकाबाई चंद्रकांत पाटील रा.भेंडखळ, ता.उरण, जि.रायगड ४) मंदाकिनी हरजीवन पाटील, ५) श्री.कुंदन हरजीवन पाटील, ६) श्री.प्रितम हरजीवन पाटील, रा.डोंगरी, ता.उरण, जि.रायगड ७) सौ.नुतन सुहास पाटील रा.ई १/२२/A-१०, सेक्टर १४, न्यू पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ८) सौ.मनिषा राहूल जोगदंडे रा.घणसोली, नवी मुंबई, जि.ठाणे हेच कायदेशीर वारस आहेत. ह्या वारसांची नावे त्याच्या जागी सिडको दप्तरी रेकॉर्ड वर येणे गरजेचे झाले आहे. त्याकामी दिवाणी न्यायालयाकडून वारसदाखल्याचा निवाडा जाहीर करून घेणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे. सबब सदर कारणाकरिता अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालयात वारस दाखला मिळण्याकरिता सदरचा दि.चौ.अर्ज क्र.४८/२०२० अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारस हक्काबाबत कोणाचीही हरकत, अधिकार अथवा वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१७/०३/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.क.स्तर, उरण** | (कोर्टाचा शिक्का) | **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.क.स्तर, उरण**